राज्य मराठी विकास संस्था - घटना - १९९३.

- नियम व विनियम -

१. या नियमांना " राज्य मराठी विकास संस्था नियम" असे संबोधण्यात येईल.

व्याख्या

२. पुढे दिलेल्या संज्ञांचे अर्थ अन्य अभिप्राय संदर्भानुसार भिन्न निघत नसल्यास :-

१] "अधिनियम" म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६०.

२] "संस्था" म्हणजे राज्य मराठी विकास संस्था.

३] "नियामक मंडळ" म्हणजे संस्थेचे नियामक मंडळ,

४] "कार्यकारी समिती" म्हणजे संस्थेची कार्यकारी समिती.

५] "अध्यक्ष" म्हणजे संस्थेच्या नियामक मंडळाचा अध्यक्ष.

६] "पदसिध्द सदस्य" म्हणजे शासनामध्ये विशिष्टः पद धारण केल्यामुळे नियामक मंडळाचे सदस्यत्व मिळालेल्या व्यक्ती.

७] "अशासकीय सदस्य" म्हणजे पदसिध्द सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य.

८] "संचालक" म्हणजे संस्थेचा संचालक.

९] "प्रशासन अधिकारी" म्हणजे संस्थेचा प्रशासन अधिकारी.

१०] "कर्मचारी" म्हणजे संस्थेचे कर्मचारी.

११] "राज्य शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

१२] "आर्थिक वर्ष" म्हणजे राज्य शासनाचे आर्थिक वर्ष.

कार्यक्षेत्र

३. संस्थेचे कार्यक्षेत्र भारतात व भारताबाहेर ज्या-ज्या देशात मराठी भाषेचा वापर / अभ्यास होत आहे, त्या-त्या देशात राहिल.

हिशेबाचे वर्ष

४. संस्थेच्या हिशेबाचे वर्ष राज्य शासनाच्या आर्थिक वर्षाप्रमाणे म्हणजे, १ एप्रिल, ते ३१ मार्च असे राहिल.

## नियामक मंडळ

व्यवस्थापन

५. संस्थेचा निधी, मालमत्ता आणि सर्व व्यवहार हे संस्थेच्या नियामक मंडळाकडे विहित करण्यात येतील. हे नियामक मंडळ विविध समित्या, अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या साहाय्याने व्यवस्थापनाचे कार्य पुढील नियमांच्या तरतुदीनुसार पार पाडील.

**नियामक मंडळाची रचना**

६. नियामक मंडळामध्ये पुढे नमूद केल्याप्रमाणे सदस्यांचा समावेश असेल. :-

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | पदसिध्द अध्यक्ष. |
| २. | राज्यमंत्री,[सामान्य प्रशासन ] | पदसिध्द उपाध्यक्ष. |
| ३. | सचिव, सामान्य प्रशासन विभाग, | पदसिध्द सदस्य. |
| ४. | भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, | पदसिध्द सदस्य. |
| ५. | शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे | पदसिध्द सदस्य. |
| ६. | संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, | पदसिध्द सदस्य. |
| ७. | संचालक, आदिवासी संशोधन व विकास संस्था, पुणे, | पदसिध्द सदस्य. |
| ८, | मराठी भाषा उच्चाधिकार समितीने नामनिर्देशित केलेले दोन सदस्य. | सदस्य. |
| १०. | मराठी साहित्य महामंडळाचा प्रतिनिधी | सदस्य. |
| ११. | महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळाने नियुक्त केलेला प्रतिनिधी. | -"- |
| १२. | मराठी पत्रकार संघाचा प्रतिनिधी | -"- |
| १३. | बृहन्महाराष्ट्र परिषदेने नियुक्त केलेला प्रतिनिधी | -"- |
| १४-२२. | पुढील क्षेत्रांतील प्रत्येकी एक याप्रमाणे नऊ तज्ञ व्यक्ती - [१] साहित्य अभ्यास, [२] भाषा विज्ञान, [३] शिक्षण शास्त्र, [४] मानव्यविद्या, [५] विज्ञान, [६] तंत्रज्ञान, [७] प्रसार माध्यमे [८] लोकसंस्कृती, [९] रंगभूमी. | -"- |
| २३. | महाराष्ट्रातील विद्यापीठांपैकी एका विद्यापीठाच्या मराठी विभागाचा शासन शासन नियुक्त एक प्रतिनिधी. | -"- |
| २४. | महाराष्ट्रातील विद्यापीठांपैकी एका विद्यापीठाच्या भाषा विज्ञान विभागाचा शासन नियुक्त एक प्रतिनिधी. | -"- |
| २५. | महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांमधील मराठी विभागांच्या प्राध्यापकांचा एक शासन नियुक्त प्रतिनिधी. | -"- |
| २६. | महाराष्ट्राबाहेर मराठीच्या विकासाचे काम करणा-या प्रमुख संस्थांतून एक शासन | -"- |